# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२६ फेब्रुवारी २०२५







# लाडकी बहीण योजना हळूहळू बंद होईल : खा.कल्याण काळे



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, जालना :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली होती. या योजनेतंर्गत महिलांना दर महिन्याला १५०० रुपये देण्यात येतात. एवढंच नाही तर निवडणुकीच्या प्रचारात महायुतीने आश्वासन दिलं होतं की जर पुन्हा महायुतीचं सरकार सत्तेत आलं तर १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्यात येतील. आता निवडणुकीनंतर पुन्हा एकदा महायुतीचं सरकार सत्तेत येऊन काही महिने झाले आहेत. मात्र, अद्याप लाडकी बहीण योजनेच्या १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याच्या आश्वासनावर कोणताही निर्णय झालेला नाही. यातच आता लाडकी बहीण योजनेबाबत काही निकष लावल्याची चर्चा आहे. एवढंच नाही तर अपात्र ठरणाऱ्या महिलांना या योजनेमधून वगळण्यात येत असल्याचंही बोललं जात आहे.

दरम्यान, आता लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी एक मोठा दावा केला आहे. ५० लाख लाडक्या बहिणींची चौकशी सुरु असल्याचं कल्याण काळे यांनी म्हटलं आहे. तसेच हळूहळू ही लाडकी बहीण योजना बंद होणार असल्याचंही विधान खासदार कल्याण काळे यांनी आज माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानामुळे लाडकी बहीण योजनेबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु झाल्या आहेत.

**खासदार कल्याण काळे काय म्हणाले?**

लाडक्या बहिणींच्या चौकशीबाबत तुमच्यापर्यंत ९ लाखांचा आकडा आला, माझ्यापर्यंत १८ लाखांचा आकडा आला आहे. मात्र, आता हा आकडा ५० लाखांपर्यंत जाणार आहे. लाडकी बहीण योजनेबाबत एकच सांगतो की हळूहळू ही योजना बंद होणार आहे. ही लाडकी बहीण योजना नव्हती तर सरकारच्या तिजोरीतून मते खरेदी करण्याचा कार्यक्रम होता, असा आरोप खासदार कल्याण काळे यांनी केला आहे.

आमच्या लाडक्या बहिणींना वाटलं की लाडकी बहीण योजना आहे म्हणून पैसे दिले. पण ते मतांसाठी पैसे दिले होते. आता कळायला लागलं की महायुतीचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. सरकारने आता जवळजवळ ५० लाख महिलांची चौकशी सुरू केली आहे आता त्या महिलांचे नावं या योजनेतून कसे कमी होतील यासाठी हे सर्व सुरु आहे. पण ही लाखो बहिणींची फसवणूक केली जात आहे. अशा पद्धतीने जर कोणी आमच्या बहिणींचा निवडणुकीसाठी उपयोग करणार असेल तर आम्ही याचा जाब अधिवेशनात सरकारला विचारणार आहोत, असं खासदार कल्याण काळे यांनी म्हटलं आहे.

# ३७२ प्राथमिक शिक्षकांना जुनी पेन्शन योजना ; जिल्हा परिषद प्रशासनाचा निर्णय



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** २००५ पूर्वीची भरती जाहिरात असणार्या मात्र २००५ नंतर सेवेत आलेल्या जिल्ह्यातील ३७२ प्राथमिक शिक्षकांना सरकारच्या आदेशानूसार जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी घेतला आहे. ग्रामविकास विभागात काम करणार्या सर्व संवर्गात जुनी पेन्शन मंजूर करून घेण्यात शिक्षक संवर्ग नंबर वन ठरला असून या निर्णयामुळे २००५ च्या पूर्वी सेवेत आलेल्या इतर संवर्गाचा जुन्या पेन्शनचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सरकारने २००५ पूर्वी सेवेत दाखल झालेल्या अथवा २००५ च्या भरतीच्या जाहिरातीनूसार अर्ज करून २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या सर्व कर्मचार्यांना जुनी पेन्शन लागू करण्याचे आदेश राज्य सरकारच्या वतीने देण्यात आले होते. याबाबत ग्रामविकास विभागाने स्वतंत्र आदेश काढत जिल्हा परिषदे कर्मचार्यांसाठी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाला दिले होते. त्यानूसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी सर्वप्रथम जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचा हा विषय निकाली काढण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी भरतीची जाहिरात निघालेल्या मात्र, २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या मराठी माध्यमातील २६४, उर्दु माध्यमातील ९ शिक्षक व आंतरजिल्हा बदलीने आलेल्या ९९ अशा ३७२ शिक्षकांना शासनाच्या आदेशानूसार जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी घेतला आहे.

सरकारच्या जुन्या पेन्शनबाबत निर्णय घेणारी नगर जिल्हा परिषद ही राज्यातील बहुदा पहिली जिल्हा परिषद ठरणार असून यातही येरेकर यांनी शिक्षकांच्या जुन्या पेन्शनचा विषय सर्व प्रथम मार्गी लावला आहे. आता जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी दिली.

# यजमान नाशिक शहरसह, पिंपरी चिंचवड, परभणी, सांगली यांची किशोरी गटात उपांत्य फेरीत धडक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मनमाड :** यजमान नाशिक शहरसह, पिंपरी चिंचवड, परभणी, सांगली यांची ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या किशोरी गटात उपांत्य फेरीत धडक दिली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने मनमाड नाशिक येथील स्व. माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅटवर सुरू असलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात यजमान नाशिक शहर संघाने चुरशीच्या लढतीत पुणे ग्रामीणला २५-२२ असे चकवित उपांत्य फेरी गाठली.

शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात ईशा दारोळे नाशिकची तारणहार ठरली. मक्याच्या क्षणी ईशाने चढाईत गुण घेत नाशिकला विजयाच्या समीप नेले. विश्रांतीला नाशिक ०९-११ असे पिछाडीवर होते. या विजयात ईशाला बिंदिशा सोनार हिची चढाईत, तर सिद्धी कसबे हिची पकडीची मोलाची साथ लाभली. पुणे ग्रामीणच्या आरती खांडेकर, भूमिका माने, रचना बंड यांचा खेळ शेवटच्या क्षणी कमी पडला. नाशिक शहरचा संघ उपांत्य फेरी गाठत असताना त्यांचा ग्रामीण संघ मात्र पराभूत झाला. सांगलीने नाशिक ग्रामीणला ३९-३२ असे नमविले.

विश्रांतीला १५-१६ अशा पिछाडीवर पडलेल्या सांगलीने विश्रांतीनंतर आपला खेळ गतिमान करीत विजयाला गवसणी घातली. उत्कर्षा यादव, सानिका पाटील यांच्या चढाई पकडीच्या खेळाने शेवटच्या काही मिनिटात बाजी पलटविली. नाशिक ग्रामीणच्या सेजल काकडे, सायली खटले यांचा पूर्वार्धातील खेळ उत्तरार्धात बहरला नाही.

परभणीने जालनाला ५६-२७ असे पराभूत करीत उपांत्य फेरी गाठली. मध्यांतरापर्यंत चुरशीने चाललेल्या या सामन्यात २१-२० अशी जालनाकडे आघाडी होती. मध्यांतरानंतर सूर सापडलेल्या परभणीच्या यशश्री इंगोले, श्रावणी कुलकर्णी यांनी तुफानी खेळ करीत जालना वर ३ लोण चढवीत सामना अगदीच एकतर्फी केला. जालनाच्या कल्याणी शिंदे, नंदा नागवे या पूर्वार्धातील चमक उत्तरार्धात दाखवू न शकल्याने त्यांना मोठ्या गुणांनी पराभव पत्करावा लागला. शेवटच्या सामन्यात पिंपरी चिंचवडने मुंबई उपनगर पूर्वचा ५९-२५ असा सहज पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. आक्रमक सुरुवात करीत पहिल्या डावातच ३ लोण देत पिंपरी चिंचवडने उपनगराच्या गोठ्यातील हवाच काढून घेतली. दुसऱ्या डावात आणखी एक लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. पहिल्या डावातील पिछाडीने खचलेल्या उपनगरला पुन्हा सावरता आले नाही. समृद्धी लांडगे, संतोषी थोरवे यांच्या झंझावाती चढाया त्यांना सोनाक्षी वाबळे, सिद्धी वाबळे यांची मिळालेली भक्कम पकडीची साथ यामुळे हा मोठा विजय शक्य झाला. उपनगर कडून सेरेना म्हसकर,आस्था सिंग, सारा येवले, तनुश्री यांचा प्रतिकार दुबळा ठरला.

किशोरांच्या ड गटात सांगलीने बलाढ्य अशा पुणे ग्रामीणचा ४८-३० असा पराभव केला. आक्रमक सुरुवात करीत सांगलीने विश्रांतीलाच २७-११ अशी भक्कम आघाडी घेतली. नंतर संयमी खेळ करीत १८ गुणांनी विजय संपादन केला. वीरप्पा बागर, दीपक राठोड, श्री पळसे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला याचे श्रेय जाते. पुणे ग्रामीणच्या अनुभव देवकाते, नईम पठाण यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी पडला. याच गटात उस्मानाबादने धुळ्याच्या प्रतिकार ४७-३९ असा मोडून काढला. विश्वनाथ सुपेकर उस्मानाबाद कडून, तर कृष्णा चित्ते धुळ्याकडून उत्कृष्ट खेळले.

ठाणे ग्रामीणने इ गटात मुंबई शहर पूर्वचा ४७-३६ असा पाडाव केला. या दुसऱ्या पराभवाने मुंबईचे आव्हान साखळीतच संपुष्टात आले. रोनित धुमाळ, आदित्य चिंचोलकर यांच्या चतुरस्त्र खेळाने ठाण्याने हा विजय मिळविला. दर्शिल जाधव, प्रणव बर्गे यांचा खेळ मुंबईचा पराभव टाळू शकला नाही. याच गटात रायगडाने सार्थ सातमकर विघ्नेश बामणे, मंथन पाटील यांच्या चतुरस्त्र खेळाने रत्नागिरीला ३६-२९ असे नमविले. ओम पाडावे, सुमित राठोड रत्नागिरी कडून बरे खेळले.

## थोडक्यात

### नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात उ.बा.ठा गटाकडून तीव्र आंदोलन...




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिल्ली येथे पार पडत असलेल्या साहित्य संमेलनात नीलम गोऱ्हे यांनी दोन मर्सिडीज गाड्या मिळाल्या की एक पद मिळते. हे विधान केले. या विधानाचा विरोध करण्यासाठी मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दिवा शहरातील (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील महिला आघाडी, पुरुष, युवतीसेना, युवासेना एकत्र येऊन नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात तीव्र आंदोलन केले.

### नवी मुंबई विमानतळाच्या हद्दीत मांस विक्री

**दि.२५, मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीपासून फक्त ३ किमी अंतरावरील उलवे परिसरात मांस विक्री करण्यात येत आहे. दरम्यान, याप्रकरणी विमानविषयक नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याचा दावा पर्यावरणप्रेमींनी केला आहे. तसेच यामुळे परिसरात कावळे, घारी यासारखे पक्षी आकर्षित होत असल्याचे पर्यावरणप्रेमींनी सांगितले. कोणत्याही विमानतळाच्या १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल करू नये असा नियम आहे. असे असतानाही नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीपासून ३ किमी अंतरावरील उलवे परिसरातील सेक्टर १९ येथे प्राण्यांची कत्तल करून मांस विक्री केली जात आहे. यामुळे नागरी विमान वाहतूकविषयक नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा पर्यावरणप्रेमींनी केला आहे. याबाबत पर्यावरणप्रेमी आणि नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या बी. एन. कुमार यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे तक्रार केली आहे. तसेच एअरड्रोम पर्यावरण व्यवस्थापन समितीच्या (एईएमसी) नियमावलीत विमानतळाच्या १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल करू नये या नियमाचा समावेश आहे, असे कुमार यांनी सांगितले. रम्यान, मांस विक्री केल्यामुळे या परिसरात कावळे, घार यांच्यासह सर्व प्रकारचे पक्षी आकर्षित होऊ शकतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधीबरोबरच इतर पक्ष्यांना यांचा अधिक धोका होऊ शकतो. यामुळे स्वच्छतेचे सर्व नियमही धाब्यावर बसवले जात आहेत. उरण तालुक्यातील चिरनेर येथे जानेवारी महिन्यात कुक्कुटपालकाच्या कोंबड्या बाधित होऊन मृत झाल्या होत्या. यामुळे तालुक्यातील बर्डफ्लयू रोखण्यासाठी पक्षी मारण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते.




## गझल सम्राट...

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे.

नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली.

त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# भगवान शिवजींचे स्वरूप-बारा ज्योतिर्लिंग

हिंदू पौराणिक कथेनुसार, ज्योतिर्लिंग हे भगवान शिवाचे स्वरूप आहेत.समस्त हिंदुचे आस्थेचे प्रतिक असलेले सर्वांच्या मनोकामना पूर्ण करण्याचे पवित्र स्थाने आहेत.भगवान शिवजींचे स्वरूप म्हणून संपूर्ण भारतभर बारा वेगवेगळ्या ठिकाणी स्थित आहे.ही तीर्थक्षेत्रे भगवान शिवाची सर्वात पवित्र पूजास्थळे मानली जातात आणि दरवर्षी हजारो भक्त भेट देतात.या सर्व पवित्र प्रार्थना स्थळांना स्मरणासाठी संस्कृत मध्ये रचले त्याला बारा ज्योतिर्लिंग मंत्र म्हटल्या जाते.हिंदू धर्मानुसारअसे म्हटल्या जाते की बारा ज्योर्तिलिंगाचे नावानुरूप मंत्र जर दररोज पहाटे व सायंकाळी स्मरण केल्यास पापांचा विनाश होतो. हा महाप्रभावी मंत्र पुढीलप्रमाणे बघूयात

सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालमोमारममलेश्वरम् ।।१।।
परल्यां वैद्यनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ।।२।।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये ।।३।।
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ।।४।।

वरील मंत्रामध्ये हिंदू धर्मातील पवित्र तिर्थक्षेत्र तथा बारा ज्योतिर्लिंग यांच्या नामाचा उल्लेख आहे. या श्लोकाच्या पठणाने आपसूकच समस्त ज्योतिर्लिंगाचे स्मरण होते.श्लोकातील क्रमवारी प्रमाणे प्रथम ज्योतिर्लिंग म्हणजे सौराष्ट्र सोमनाथ येथे कपिला, हिरण आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम असल्यामुळे सोमनाथ हे ठिकाण प्राचीन काळापासून तीर्थक्षेत्र आहे. सोम,चंद्रदेव शापामुळे त्याची वासना गमावली असे मानले जाते आणि ते परत मिळविण्यासाठी त्याने या ठिकाणी सरस्वती नदीत स्नान केले. याचा परिणाम म्हणजे चंद्राची होणारी घट आणि वृद्धी होते असे मानले जाते. या क्षेत्राचे नाव प्रभास म्हणजे चंद्राचे तेज किंवा चमक म्हणून सोमेश्वर किंवा सोमनाथ असे प्रचलित झाले.

उल्लेखित द्वितीय ज्योतिर्लिंग म्हणजे श्रीशैलम.या क्षेत्राचा इतिहास सातवाहन काळापर्यंत सापडतो. चौदाव्या शतकातील प्रोलया वेमा रेड्डी या राजाचा कार्यकाळ हा श्रीशैलमचा सुवर्णकाळ मानला जातो. राजा प्रोलयाने पाताळगंगा म्हणून ओळखली जाणारी कृष्णा नदी ते श्रीशैलम असा मार्ग बांधला. या नंतर अतिशय ताकदवान अशा विजयनगर साम्राज्यात मुख्य मंदिराचे आणि दक्षिण टोकाकडील गोपुरांचे दगडी बांधकाम करण्यात आले. पुढे पंधराव्या शतकात विजयनगर साम्राज्य नावारूपास आणणारे राजा कृष्णदेवराय यांनी राजगोपुर आणि सलुमंतापस व इतर भागाचे निर्माण कार्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजय मोहिमेच्या वेळी मंदिराच्या उत्तरेकडील गोपुराचे बांधकाम केले अशी इतिहासात नोंद आहे.



ज्योतिर्लिंगमंत्रातील तिसरे असे हे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रामध्ये भगवान शिवजींचे सर्वात पवित्र निवासस्थान असे मानले जाते. हे मध्य प्रदेश राज्यात उज्जैन येथे आहे. रुद्र सागर तलावाच्या बाजूला हे मंदिर आहे. येथील शिवलिंग हे स्वयंभू स्थितीत विराजमान आहे असे समजले जाते.ओंकारेश्वर हे चौथ्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग असून मध्य प्रदेश राज्याच्या खंडवा जिल्ह्यात आहे. हे नर्मदा नदीमध्ये शिवपुरी नामक बेटावर वसलेले आहे.हे स्थळ हिंदुसाठी पवित्र चिन्ह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॐच्या आकारामध्ये बनले आहे.औंकारेश्वर व अमरेश्वर असे दोन मंदिर आहे. हे पवित्र क्षेत्र नर्मदा नदीकाठी असून नर्मदा नदी भारतातील पवित्र नदी आहे.मध्यप्रदेशात प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ ज्योतिर्लिंगे आहेत. एक महाकालेश्वर नावाचे उज्जैन मध्ये तर दुसरे ओंकारेश्वर तेथेच स्थित आहे.ज्योतिर्लिंगा पैकी पाचवे परळी वैजनाथ.हे महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात असून परळी वैजनाथ हे दक्षिण मध्य रेल्वेवरील एक स्थानक आहे. परळी वैजनाथ हे परळी वैद्यनाथ म्हणूनही ओळखले जाते. महाशिवरात्रीच्या दिवशी वैद्यनाथ जयंती असते.तसेच ते परळी वैजनाथ तालुक्याचे मुख्यालय आहे.परळी येथील वैद्यनाथ मंदिर प्रसिद्ध असून भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग हे जागृत समजले जाते. हे मंदिर यादवकालीन आहे मात्र मोगलांनी मंदिराची नासधूस केल्यानंतर पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. हे मंदिर भव्य परिसरात बांधले आहे.भारतातील बारा ज्योर्तिलिंगापैकी सहावे ज्योर्तिलिंग म्हणजे भीमाशंकर.सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पसरलेल्याभागात एका रांगेवरील उंच डोंगरावर भीमाशंकर आहे. पावसाळा व हिवाळ्यामध्ये हिरवेगार असे वातावरण सभोंवताली सदैव हिवराईने नटलेले असते.हेमाडपंथी कलेतील ह्या मंदिराचे बांधकाम बाराव्या ते तेराव्या शतकातील आहे.सभामंडपाबाहेर भव्य घंटा आहे. हेमाडपंती पद्धतीचे बांधकाम असलेल्या या मंदिराचा जीर्णोद्धार छत्रपती शिवरायांनी जीर्णोद्धार केला.छत्रपती शिवाजी महाराज येथे दर्शनास येत असत. राजे शिवराय व राजे संभाजी महाराजा नंतर पेशवे काळातही मंदिराचा जिर्णोद्धार झालेला दिसून येतो.हे ज्योतिर्लिंग सह्याद्रीच्या प्रमुख रांगेत असून महाराष्ट्र राज्यातील अतिशय आकर्षक आहे.बारा ज्योतिर्लिंगांपैकी सातवे रामेश्वरम ज्योतिर्लिंग हे भारताच्या तमिळनाडू राज्यातील असून रामेश्वरम शहरामधील एक भव्य शिवमंदिर आहे.पुराणानुसार श्रीराम चंद्रप्रभू यांनी येथील लिंगाची स्थापना केली अशी कथा आहे.लंकेला जाण्या अगोदर या ठिकाणी श्रीराम चंद्रप्रभू यांनी शिवजींची आराधना केली. हे तीर्थक्षेत्र बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग तर आहेच त्याचबरोबर चार धामांपैकी एक धाम म्हणूनही याची ओळख आहे.बारा ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग असून औंढा नागनाथ महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यात स्थित असे हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.पूर्वीच्या काळी या स्थानाला 'दारुकावण'म्हटल्या जायचे सध्या या शहराला औंढा म्हणून ओळख आहे.क्रूर औरंगजेबाने मंदिराची नासधूस केल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचा जिर्णोद्धार केला.

विश्वेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी नववे ज्योतिर्लिंग आहे. शंकराचे हे रूप काशीत पूजले जाते.हे मंदिर पूर्वी वाराणसी येथे होते. काशीतील मुख्य विश्वनाथ मंदिर म्हणून पुराणात याचा उल्लेख आहे मात्र मुस्लिम आक्रमकांनी हे मंदिर पाडले.या मंदिराच्या ठिकाणी मशीद उभारली. अनेक वर्षे दुर्लक्षित आणि मुस्लिमांद्वारे प्रतिबंधित राहिल्यावर तोरडमल राजाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला,परंतु क्रूर औरंगजेबाने या मंदिरावर वक्रदृष्टी टाकून नासधूस केली.काही वर्षे उलटल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी विश्वनाथाचे मंदिर बांधले.महाराष्ट्रातील नाशिक जवळचे त्र्यंबकेश्वर बारा ज्योतिर्लिंगापैकी दहावे ज्योतिर्लिंग आहे.येथे दर बारा वर्षांनी अर्ध सिंहस्थ कुंभमेळा भरत असून येणारा २०२७ मध्ये राहील. येथे संत निवृत्तिनाथ महाराज यांची समाधी मंदिर आहे. पौष महिन्यात तेथे यात्रा भरते.पायीवारीने भाविक तेथे येतात म्हणून त्याला पौषवारी सुद्धा म्हणतात.गोदावरी नदीचाही उगम येथेच झाला.असून ती दक्षिणेकडे वाहत जाते.

केदारनाथ मंदिर हे भगवान शिव शंकराचे भव्य मंदिर आहे.आपल्या देशाच्या उत्तराखंड राज्यातील केदारनाथ गावामध्ये स्थित असे हे दिव्य क्षेत्र असून भाविकांसाठी थोडे खडतर प्रवासाचे आहे. केदारनाथ हिंदू धर्मातील सर्वात पवित्र स्थानांपैकी एक असून बारा ज्योतिर्लिंगांपैकी अकरावे ज्योतिर्लिंग आहे. हिमालय पर्वतामध्ये स्थित असलेल्या केदारनाथांचे भाविकांच्या सुरक्षे साठी तेथील हिमवृष्टी व इतर नैसर्गिक संकटे लक्षात घेता काही काळ बंद असते. केदारनाथ हे ज्योतिर्लिंग सर्व ज्योतिर्लिंगांपैकी सर्वात जास्त उंचीवर असून दर्शनाला जाण्यासाठी गौरीकुंड या ठिकाणापासून साधारण चौदा ते पंधरा किलोमीटर अंतर पायीच जावं लागते. घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर असून बारा ज्योतिर्लिंगापैकी ज्योतिर्लिंगमंत्राप्रमाणे बारावे ज्योतिर्लिंग असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यास्थित आहे.देवगिरी (दौलताबाद)पासून सुमारे ११ कि.मी. अंतरावर आहे. दगडात कोरलेल्या वेरूळ लेण्यांजवळ हे मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील शहाजीराजे भोसले व आजोबा मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा प्रथमतः १६ व्या शतकात जीर्णोद्धार केला.

अश्या प्रकारे संपूर्ण भारतभर पवित्र ज्योतिर्लिंगस्थान आहे.गुजरात येथे गीर सोमनाथ,आंध्रप्रदेश येथे श्रीशैल्य मध्यप्रदेश येथे महाकालेश्वर ओंकारेश्वर,महाराष्ट्रामध्ये परळी,भीमाशंकर,नागनाथ,त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर मंदिर,तामिळनाडू येथे रामेश्वरम ,उत्तराखंड येथे केदारनाथ व उत्तरप्रदेश येथे विश्वेश्वर असे बारा पवित्र तिर्थस्थाने व ज्योतिर्लिंग आहे. प्रामुख्याने यातील पाच ज्योतिर्लिंग हे संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या महाराष्ट्रामध्ये आहे.

**समस्त भाविकांना**
**महाशिवरात्रीच्या शुभेच्छा....!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## शिवरूप..

सांबसदाशिव शांताति
प्रिय शांति तृप्ती प्रिती
भोळासांभ सांगे भक्ता
अनाठाई नसावी शक्ती

पचवतो निळकंठ जहर
विषारीनागअंगाभोवती
अमृत दान जगतास्तव
समतोल समुद्रमंथनांति

शीतलचंद्र डोक्या वरती
जटेत गंगा अमृत भरती
संकट मोचन करणेस्तव
पुत्र विघ्न हर्ता गण पती

सुमनटराज तांडव करी
आपत्तीयेता भक्तावरती
त्रिनेत्र करितो भस्मसात
प्रलयांति सु स्थीर धरती

स्मशानातआवडे वसती
भस्मांकित तनू विरक्ती
महामृत्युंजय मंत्र जपता
सहज प्राप्ति मोक्ष मुक्ती

सौम्य तथा रौद्र आकृति
पत्नीपार्वती आदिशक्ती
वेदो शिवम् शिवो वेदम्
अर्धनारी नटेश्वर सुवृत्ती

ब्रह्मांड प्रतिक लिंगरूप
शिवोपसना भुक्ती मुक्ती
शिवरात्रीस उत्पन्न होते
लौकिक लयात्मकशक्ति

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# 'हर हर महादेव'चे सामर्थ्य !

२६ फेब्रुवारी म्हणजे महाशिवरात्रीच्या दिनी प्रयागराज येथील महाकुंभात शेवटचे अमृत स्नान पार पडणार आहे. त्रिमूर्तींपैकी एक भगवान शिव हिंदूंचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. सृष्टीचे निर्माणकर्ता श्री ब्रह्मदेव, पालनकर्ता श्री विष्णुदेव आणि संहारकर्ता श्री महादेव आहेत. म्हणूनच मृत्यू किंवा मोक्ष यावर श्री महादेवाचा अंकुश आहे, असे म्हटले जाते. गतजन्मातील पापकर्मांमुळे आपणास या जन्मात प्रारब्ध म्हणून मानसिक आणि शारीरिक व्याधी भोगाव्या लागतात या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य श्री महादेव करतात, अशी अनेकांची धारणा आहे. शिवाचे भारतासह जगभरात कोट्यवधी भक्त आहेत. शिवाच्या नियमित उपासनेने भय, दुःख, रोग, दारिद्र्य नाहीसे होऊन जीवनात सुख शांती आणि समृद्धी लाभते असा श्रद्धाळुंचा समज आहे. शिवाचे व्रत म्हणून अनेक जण सोळा सोमवार करतात, श्रावण महिन्यात सोमवारी निराहार राहतात. महाशिवरात्रीचे व्रत करतात. शिवाचे अघोरी उपासकही आहेत जे स्मशानात जाऊन शिवाची उपासना करतात. या सर्वांचे दर्शन आपल्याला यंदाच्या महाकुंभाच्या निमित्ताने झाले. 'ओम नमः शिवाय' हा शिवाचा मंत्र आहे. तर 'हर हर महादेव' हा जयघोष आहे. ज्योतिर्लिंगांच्या स्थानी किंवा शिवाच्या मंदिरांत गेल्यावर 'हर हर महादेव' चा जयघोष आपल्याला हमखास ऐकायला मिळतो. 'हर हर महादेव' या जयघोषात प्रचंड सामर्थ्य आहे, त्यामुळेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा स्वराजाच्या सैन्याचा म्हणजेच मावळ्यांचा जयघोष 'हर हर महादेव'च ठेवला होता. या जयघोषाची त्यावेळेस प्रचंड दहशत होती. 'हर हर महादेव'चा घोष कानी पडताच स्वराज्याचे शत्रू यवन थरथर कापू लागत. याच 'हर हर महादेव' घोषाचे महत्व आता विज्ञानाच्या स्तरावही सिद्ध झाले आहे.

वाराणसीतील आयएमएस बीएचयूच्या फॅकल्टी ऑफ डेंटल सायन्सचे डॉक्टर तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांवर आगळ्या पद्धतीने उपचार करत आहेत. या ठिकाणी शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना दोन्ही हात वर करून 'हर हर महादेव' चा जयघोष करण्यास सांगितले जाते.




या अनोख्या उपचारामुळे रुग्णांना अवघ्या दोन महिन्यांत आराम मिळतो. डॉक्टरांनी तोंडावर शस्त्रक्रिया करताना रुग्णांच्या छातीचे काही स्नायू कापून त्यांचे रुग्णांच्या शस्त्रक्रिया केलेल्या भागावर रोपण केले असता रुग्णांच्या हाताची आणि खांद्यांची हालचाल पूर्णतः थांबल्याचे लक्षात आले. ही हालचाल पूर्ववत होण्यासाठी फिजिओथेरपीचे नेहमीचे उपचार करूनही विशेष फरक पडला नाही; मात्र याच रुग्णांनी 'हर हर महादेव'चा जयघोष करत हात वर करण्याचा प्रयत्न केल्यावर हळूहळू अवयवांची हालचाल होऊ लागली आणि रुग्णांनाही आराम मिळू लागला. या आगळ्या वेगळ्या प्रयोगाची कर्करोगाच्या ३०० हुन अधिक रुग्णांवर चाचणी करण्यात आली, त्यापैकी ८० टक्याहुन अधिक लोकांना विस्मयकारक आराम मिळाला, ज्या रुग्णांनी प्रतिदिन गांभीर्याने ही थेरेपी केली त्यांना दोन अडीच महिन्यांत त्यांचे हात पूर्णतः वर करता येऊ लागले. फिजिओथेरपीवर लाखो रूपये खर्च करूनही जो परिणाम मिळू शकला नाही तो केवळ 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अवघ्या दोन महिन्यांत मिळाला. येथील विद्याशाखा प्रमुख एच. सी. बरनवाल यांनी सांगितले कि, वैद्यकीय शास्त्रात प्रथमच 'हर हर महादेव' ही थेरपी म्हणून जगभरात स्वीकारली गेली आहे. विद्याशाखेचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अखिलेश सिंह यांनी सांगितले कि 'हर हर महादेव'च्या घोषाने आध्यात्मिक शक्ती निर्माण होते जिचा आध्यात्मिक स्तरावर लाभ, तर होतोच शिवाय ही एक अशी फिजिओथेरपी आहे ज्यामध्ये अधिक श्रम करावे लागत नाहीत. काशीच्या लोकांना नेहमीच्या बोलण्यात 'हर हर महादेव'चा जयघोष करण्याची सवय आहे; मात्र ही सवय म्हणजे सर्वात अधिक परिणामकारक फिजिओथरपी आहे. हे त्यांनाही माहीत नाही. छत्रपती शिवरायांनी मूठभर मावळ्यांच्या बळावर पाच पातशाह्यांना धूळ चारली. हजारो मुघल सैन्यावर काही शेकडा मावळे तुटून पडत आणि त्यांच्यावर विजयही मिळवत. त्यांना ही शक्ती आणि सामर्थ्य देण्याचे काम 'हर हर महादेवचा' जयघोष करत असे हे आता लक्षात येते.

भगवंताच्या नामामध्ये किती सामर्थ्य आहे हे आता विज्ञानाच्या पातळीवरही सिद्ध होऊ लागले आहे. कलियुगामध्ये समस्त संतांनीही नामजपाचे महत्व विशद केले आहे. नियमित नामजपाने मनाची शक्ती वाढून मन एकाग्र होते, विद्यार्थ्यांना अभ्यासात मन एकाग्र करण्यासाठी नामजप एक प्रभावी उपाय आहे. व्यावहारिक जगातील स्पर्धेमुळे ताण आणि नैराश्य यांनी अनेकांना ग्रासले आहे. मनावरील ताण नाहीसा करण्यासाठीही नियमित नामजप गुणकारी आहे. जिथे जिथे देवतेचे नाम आहे तिथे त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती एकवटलेली असते असे धर्मशास्त्र सांगते त्यामुळे नामजपाच्या आध्यात्मिक स्तरावर लाभ तर होतोच शिवाय मानसिक स्तरावरही होतो. ज्या नामाने दरोडेखोर वाल्याचा वाल्मिकी झाला त्या नामापुढे आपले साधे सुधे आजार आणि रोग एव्हढे मोठे आहेत का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क :९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## महाशिवरात्रीनिमित्त ढोकेश्वर मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** वै.ह.भ.प विठ्ठल महाराज पायमोडे व वै ह.भ.प बबन महाराज पारयमोडे यांच्या कृपाआशिर्वादाने तसेच ह.भ.प नारायण महाराज जाधव व ह.भ.प विकासानंद महाराज मिसळ यांच्या प्रेरणेने महाशिवरात्रीनिमित्त टाकळी ढोकेश्वर येथील श्री क्षेत्र ढोकेश्वर मंदिरात मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी ते गुरुवार, दि.२७ फ ेब्रुवारी २०२५ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून तीन दिवस नामवंत कीर्तनकारांची किर्तन सेवा पार पडणार आहे. सप्ताहाचे यंदाचे १२ वे वर्ष आहे. रामेश्वर महाराज भोजने, आळंदी देवाची, बाळकृष्ण महाराज कांबळे, ताहाराबाद, किर्तन केसरी उद्धव महाराज कोतवाल, वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर यांची कीर्तने तर पोपटराव वाकचौरे यांचे शिवलीलामृत पारायण होणार असून तीन दिवस दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने विशाल भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले असून त्याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ व शिवाजी झावरे तसेच सागर भालेराव बप्पा ढोकेश्वर मंदिर पुरोहित यांनी केले आहे.

## रिक्षामध्ये विसरलेली लॅपटॉप बॅग पोलिसांच्या तत्परतेने मालकाला परत



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५ डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवलीतील रीजन्सी अनंतम येथे लग्नसमारंभासाठी आलेल्या चैत्राली लागू (रा.पुणे) यांची लॅपटॉप बॅग रिक्षामध्ये विसरल्याची घटना मंगळवार,२५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घडली. लागू यांनी आपली बॅग रिक्षामध्ये विसरल्याचे लक्षात येताच तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. यानंतर मपोहवा/३९३ शिंदे आणि पोहवा/६६८८ सोनवणे यांनी तातडीने रीजन्सी अनंतम येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेज दाखवल्यानंतर चैत्राली लागू यांनी वापरलेल्या रिक्षाची खात्री केली. पोलिसांनी तत्काळ रिक्षाचा नंबर शोधून काढला आणि संबंधित रिक्षाचालक राजपूत यांना मोबाईलवर संपर्क साधला. चौकशीत रिक्षाचालकाने बॅग रिक्षामध्ये असल्याची माहिती दिली. पोलिसांच्या सूचनेनुसार रिक्षाचालकाने बॅग परत आणून दिली. चैत्राली लागू यांना त्यांची लॅपटॉप बॅग सुखरूप परत मिळाल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानले. पोलिसांच्या वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे हरवलेली बॅग काही तासांत परत मिळाल्याने नागरिकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

## शासकीय योजना व कायदेविषयक जनजागृती मेळावा संपन्न




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२५, जव्हार (पालघर) :** तालुका विधी सेवा समिती जव्हार व जव्हार तालुका विधिज्ञ संघटना यांच्या सौजन्याने शासकीय योजना व कायदेविषयक जनजागृती मेळावा मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी जुनीजव्हार ग्रामपंचायतमधील काळीधोंड येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संविधान उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिजित ना गायकवाड दिवाणी न्यायाधीश जव्हार होते. तर प्रमुख अतिथी म्हणून भाऊसाहेब फटांगरे अप्पर जिल्हाधिकारी पालघर मुख्यालय जव्हार, गणपतराव पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार, लता धोत्रे तहसीलदार जव्हार, मूयर चव्हाण तहसीलदार मोखाडा, चारूशीला पवार तहसीलदार विक्रमगड, दीपक टिके सहाय्यक प्रकल्प अधिकारी जव्हार, महादेव राऊत वनपरिक्षेत्र अधिकारी, जव्हार मधुकर गवळी सहाय्यक गटविकास अधिकारी, मोखाडा निलेश भोये सरपंच जुनीजव्हार, श्रावण खरपडे माजी जि. प. सदस्य, तसेच डॉ.किरण पाटील अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी जामसर, जयराम हरी आढळ तालुका कृषी अधिकारी जव्हार, उज्वला कोकणे जिल्हा अग्रणी बँक प्रतिनिधी, विधीज्ञ संघटनेचे पदाधिकारी व सदस्य इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद शाळा काळीधोंड येथील विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर जुनीजव्हार ग्रामपंचायत अधिकारी संदीप घेगड यांच्या हस्ते वृक्ष देऊन सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद पालघर आणि पंचायत समिती जव्हार यांच्या वतीने ज्यूडो-कराटे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा २) अंतर्गत मंजुरी आदेशांचे वितरण व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ९० टक्के अनुदानित शेळी वाटप दिव्यांग लाभार्थ्यांना तसेच आदिवासी विकास विभागाच्या न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत जेजुरी महिला बचत गट आकरे व पत्रावळी मशीन योजनेचे धनादेश चे वाटप मान्यवरांच्या हस्ते केले. त्यानंतर शासकीय योजनांसाठी विभागीय स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## झाडांना मिळाले जीवदान मनाला मिळाले समाधान - उल्हास तुपे



**अक्षराज : धीरज महानगरे**

**दि.२५, हडपसर (पुणे) :** पै.उल्हास तुपे यांनी झाडांकडे लक्ष दिल्यामुळे आणि त्याची माहिती मिळताच लगेच बातमी लावल्यामुळे झाडांना पुन्हा जीवदान मि ळाले. महत्त्वाचे म्हणजे शिवसेनेच्या दणक्यामुळे पडणारी ३० झाडे वाचली. अमनोरा मॉलमध्ये ३० झाडे कितीतरी वर्ष झाले झाडांची माती काढल्यामुळे मूळ वरती येऊन कमकुवत झाली होती. काही झाडे मुळ तुटल्यामुळे पत्र्यावर पडून सुकून गेली. पुणे जिल्हा प्रमुख उल्हास तुपे यांनी मॉलच्या मॅनेजर सोबत फोनवरून बोलून झाडांना कठडे बांधण्यास सांगितले. तसेच माती टाकायला लावली. त्यामुळे मरणारी ३० झाडे परत व्यवस्थित उगवतील. अशी आशा पल्लवित झाली आहे! एवढी मोठी झाडे होण्यासाठी १०-१५ वर्ष लागतात. उन्हाळ्यामध्ये झाडांचे महत्त्व कळते. कुठल्याही भागांमध्ये बिल्डर लोकांनी अशी झाडांची कत्तल करू नये. अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल. असा इशारा पुणे जिल्हा प्रमुख उल्हास तुपे शासन नियुक्त नगरसेवक शिवसेना यांनी दिला.

# केडीएमसी, दिवा अनधिकृत बांधकाम प्रकरणावर मनसे नेते पाटलांचा सडकून हल्लाबोल



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, डोंबिवली (ठाणे) :** केडीएमसीच्या हद्दीतील ६५ बेकायदा इमारती आणि दिव्यातील अनधिकृत बांधकाम प्रकरणावरून महाराष्ट्र नवनिम र्ण सेनेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन शिंदे पिता-पुत्रांवर नाव न घेता सडकून टीका केली.

राजू पाटील म्हणाले, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना, बनावट कागदपत्र तयार करणाऱ्यांना आणि नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांना ठाण्यातून अभय मिळतंय. त्यांनी शिंदे कुटुंबावर निशाणा साधत सांगितलं की, सेलेब्रिटींच्या घरी जाण्यासाठी वेळ आहे, पण या ६५ इमारतींमधील रहिवाशांना भेटायला मात्र वेळ नाही. ठाण्याचे पालकमंत्री आहात, नगरविकास मंत्री आहात आणि तुमचा मुलगा खासदार आहे. गंगेत डुबकी मारून पुण्य मिळवण्यापेक्षा या पीडित रहिवाशांना भेटून जास्त पुण्य मिळेल, अशी घणाघाती टीका पाटील यांनी केली.

त्यांनी विधानसभेच्या निवडणुकी दरम्यान संबंधित बिल्डरला धमकावून इम ारतीचे काम चालू ठेवण्यास लावल्याचा आरोपही केला. राजू पाटील यांनी ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांचे मुळ ठाण्यात बसले असल्याचं सांगत, गँग ऑफ डोंबिवलीचा म्होरक्या ठाण्यात आहे, असा उल्लेख केला. त्यांनी असेही म्हटले की, काही लोक फक्त आमदार दिसतात, पण खरं नियंत्रण दुसऱ्यांचंच आहे. मनसे रहिवाशांच्या बाजूने उभी आहे आणि रहिवाशांना कायदेशीर सल्ला देण्यासाठी लागणारी आर्थिक म दत मनसे करेल, असंही पाटील यांनी जाहीर केलं. मात्र, त्यांना दिलासा कसा देणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दिव्यातील बेकायदा इमारती प्रकरणात पाटील यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, ठाणे महापालिकेचा जोशी नावाचा अधिकारी आणि सत्ताधारी पक्षातील ५ नगरसेवक बेकायदा बांधकामांमध्ये भागीदार आहेत. त्यांनी खुलासा केला की, प्रत्येक स्लॅब मागे तीन लाख रुपये घेतले जात आहेत. या प्रकरणी मनसे नेते राजू पाटील यांनी लवकरच मंत्री गणेश नाईक यांची भेट घेणार असल्याचे सांगितले. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या प्रकरणात न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

राजू पाटील यांनी पत्रकार परिषदेत ठामपणे सांगितले की, जोपर्यंत या भ्रष्ट साखळीचा अंत होत नाही, तोपर्यंत मनसे रहिवाशांसोबत ठामपणे उभी राहील.

# 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' मोहिमेंतर्गत जलाशय, परिसर स्वच्छतेच्या विशेष मोहीमा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्वांगीण स्वच्छतेवर भर देण्यात येत असून विविध मोहीमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' विशेष म ोहीम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी म ुंबई महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी राबविण्यात आली. घणसोली विभागातील राजीव गांधी तलावाप्रम ाणेच खैरणे सेक्टर १२ येथील तलाव व त्याच्या परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी वने मंत्री गणेश नाईक यांची विशेष उपस्थिती होती. कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी वसंत मुंडावरे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण तसेच स्वच्छता निरीक्षक व पर्यवेक्षक आणि स्वच्छताकर्मींनी या म ोहीमेत सक्रीय सहभाग घेतला. श्री संत निरंकारी मंडळ यांचे संयोजक मनोहर सावंत व संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी स्वच्छ जल स्वच्छ मन या मोहीमेत सक्रीय सहभागी होत मोहीम यशस्वी केली.

अशाच प्रकारची मोहीम बेलापूर विभागात ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसरात सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे आणि स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांनी सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह स्वच्छताकर्मींना सोबत घेऊन राबविली. या ठिकाणीही श्री संत निरंकारी मंडळ, बेलापूर नेरुळ शिरवणे यांच्या सदस्यांनी सहभाग घेतला. वाशी सेक्टर १० येथील मिनी सीशोअर परिसरात विभाग अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त अलका म हापूरकर व स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ यांच्या माध्यमातून जलाशय व परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये वाशी विभागातील अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मी यांच्यासह श्री संत निरंकारी मंडळांचे सदस्यही मोठया संख्येने सहभागी झाले होते.

इतर ही विभागात अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, परिमंडळ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व डॉ.कैलास गायकवाड तसेच घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे व संतोष वारूळे यांच्या नियंत्रणाखाली तेथील सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी आणि स्वच्छता अधिकारी यांच्या माध्यमातून 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' मोहीमा लोकसहभागातून राबवण्यात आल्या.

# आमदारकीच्या माध्यमातून विकास कामे पूर्ण करणार - आ.दाते

## नारायणगव्हाण येथे पेढे तुला कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** आमदारकीच्या माध्यमातून सुपा गटातील गावांच्या विकासात्मक काम ाचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आ.काशिनाथ दाते यांनी दिली. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातून काशिनाथ दाते विजय व्हावेत. यासाठी कार्यकर्त्यांनी नारायणगव्हाण येथील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या प्रसिद्ध चुंबळेश्वर महादेव मंदिरात पेढे तुला करण्यात येईल, असे म हादेवाला साकडे घातले होते.

यावेळी आ.काशिनाथ दाते यांची पेढे तुला करण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी भाजप नेते विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रमसिहं कळमकर, नारायणगव्हाण माजी सरपंच सुरेश बोरुडे, दत्ता पवार, सुनील थोरात, पंकज कारखिले वसंत चेडे, अमोल मैंड, शंकरराव कांडेकर, सुषमा रावडे, सहादू शेळके बंडोपंत नाईक, माणिक शेळके, अविनाश ठुबे, अरुण चिपाडे, दिलीपराव शेळके, काशिनाथ नवले, सुदाम नवले, गणेश शेळके, शिवाजी भोसले, हसन शेख, गणेश डोमे, श्रीधर वाळुंज, तारा दरेकर, राहुल कांडेकर, चंदू कांडेकर, दादासाहेब शेळके, सविता भोसले, मंदा चव्हाण, मंगल चिपाडे आदींसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश शेळके यांनी केले तर आभार मेजर काशिनाथ नवले यांनी मानले.

**चुंबळेश्वर महादेव मंदिराचा तीर्थक्षेत्र क वर्गात समावेश होणार! आमदारकीच्या माध्यमातून सुपा गटातील गावांच्या विकासात्मक कामाचा प्रश्न सोडविण्यासाठी माझा प्रयत्न राहील. चुंबळेश्वर महादेव मंदिराचा तीर्थक्षेत्र 'क ' वर्गात समावेश करण्यासाठी जिल्हा नियोजन बैठकीत प्रयत्न करणार असल्याचे आ.काशिनाथ दाते यांनी सांगितले.**




# तारीख पे तारीख; भावी नगरसेवक संतापले




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२५, माथेरान :** अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या सुनावणीला आज पुन्हा पुढची तारीख मिळाल्याने पालिका निवडणुका आता पावसाळ्यानंतर होण्याची शक्यता वर्तवली जाते. त्याम ुळे नगरपालिका निवडणुकीकडे डोळे लावून बसलेल्या इच्छुकांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. दीर्घकाळ नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या प्रतीक्षेत असलेल्या इच्छुकांनी किती वर्षे भावी नगरसेवक म्हणून मिरवायचे.? असा सवाल शासनाला केला आहे.

निवडणुका पुढे गेल्याने कित्येकांचे नगरसेवक होण्याचे स्वप्न पुन्हा भंगले आहे. अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्था नगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत.सर्वच कार्यक्रमांना हजेरी लावत आहेत. तर सध्या लग्नसराई हळदी, क्रिकेट, बैलगाडी शर्यती अशा विविध प्रकारावर खर्च करताना दिसत आहेत.

कोरोना काळ संपल्यानंतर निवडणूक होईल, अशी आशा भावी नगरसेवकांना होती. मात्र त्यानंतर लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. त्यातच ओ.बी.सी.(ज.इ.उ.) आरक्षणाचे भिजत घोंगडे सर्वोच्च न्यायालयात असल्यामुळे या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. आता नगर पालिकांच्या निवडणुका पुन्हा पुन्हा पुढे गेल्याने अनेक इच्छुकांची हिरमोड होऊन त्यांनी माघार घेतली आहे

**एक कार्यकाळ पुढे सरकला**

राज्यातील नगरपरिषदांच्या निवडणूका २०१६ मध्ये झाल्या होत्या. त्यांची मुदत २०२१ मध्येच संपली. त्याच वर्षी निवडणूका झाल्या असत्या तर सण २०२६ ला जो पूर्ण झाला असता.

**अनेक विकासकामे ठप्प**

बराच काळ निवडणूक न झाल्याने त्याचा विकासावर परिणाम झाला असून स्थानिक पातळीवर जे नगरसेवक धोरणात्मक निर्णय घेऊ शकतात ते प्रशासक घेऊ शकत नसल्याने गावातील अनेक धोरणात्मक विकासकामे ठप्प झाली आहेत. या गोष्टीला जबाबदार कोण.? असा प्रश्न येत असला, तरी निवडणुका वेळेत झाल्या असत्या, तर आता दुसरी निवडणूक आली असती शिवाय अनेक अनेक वर्ष कार्यकर्त्यांना सांभाळून हैराण झालेले इच्छुक भावी नगरसेवक मात्र हतबल होताना दिसत आहे हे नक्की.

